# 'इको फ्रेंडली' बांधकाम प्रकल्प आदर्श निर्माण करील : गायकवाड

पिंपरी, ता. २३ : पिंपरी-चिंचवड परिसरात विलास जावडेकर अँड असोसिएटसच्या वतीने उभारण्यात येत असलेला 'इको फ्रेंडली' बांधकाम प्रकल्प हा इतर व्यावसायिक आणि महापालिकांपुढे आदर्श निर्माण करील, असे प्रतिपादन पुण्यातील 'यशदा'चे संचालक रत्नाकर गायकवाड यांनी आज येथे केले.

वाकड येथे जावडेकर अँड असोसिएटसच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या 'पलाश-द ग्रीन कम्यून'या प्रकल्पाचे भूमिपूजन श्री. गायकवाड यांनी केले. जागतिक हवामान दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ज्येष्ठ बांधकाम व्यावसायिक विलास जावडेकर, सर्वेश जावडेकर, महापालिका आयुक्त दिलीप बंड, राजेंद्र जगदाळे, आदित्य मुछाल, विजय ठोंबरे आणि नगरसेविका कमल कलाटे आदी या वेळी उपस्थित होते.



वाकड : 'ग्लोबल वॉर्मिंग'चे परिणाम दाखवून त्याबाबत घ्यावयाच्या दक्षतेची माहिती देणारी 'इको लाउंज' वाकड येथील 'पलाश-द ग्रीन कम्यून' प्रकल्पात उभारण्यात आली आहे. त्याबाबत श्री. रत्नाकर गायकवाड आणि दिलीप बंड यांना माहिती देताना आदित्य जावडेकर.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने वाकडच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पास आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याचे आश्वासन श्री. बंड यांनी दिले. 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे वातावरणावर होणारे परिणाम आणि 'इको फ्रेंडली हाउसिंग'ची गरज याची माहिती देण्यासाठी खास प्रकारची 'इको लाउंज' प्रकल्पाच्या जागेवर उभारण्यात आली आहे. त्याचे उद्‌घाटनही श्री. गायकवाड यांनी केले. वाकड येथील आठ एकर जागेत उभारण्यात येत असलेल्या या प्रकल्पात साडेतीनशे फ्लॅट्‌स, पेंट हाउसेस, डुप्लेक्स उभारण्यात येत असल्याचे संचालक आदित्य जावडेकर यांनी जाहीर केले. येत्या दोन वर्षांत प्रकल्प उभारण्याचे काम पूर्ण होईल, असे त्यांनी सांगितले.